# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com

क्र. मआविवि/पीआर/७०७/२०११ दि.०९ जुलै २०११

वृत्त प्रसिध्दीसाठी

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या एम.डी. होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रमास केंद्र सरकारची मान्यता.

**नाशिक (दि.०९) –** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या एम.डी. (होमिओपॅथी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमास केंद्र सरकारने केंद्रीय होमिओपॅथी परिषदेच्या द्वितीय परिशिष्टात समाविष्ट करुन याबाबत नुकतेच काढण्यात आलेल्या राजपत्र भाग २ - खण्ड३ - उपखण्ड (२) अन्वये मान्यता दिली असल्याची माहिती विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देतांना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित दहा होमिओपॅथीक महाविद्यालयात एम.डी. (होमिओपॅथी) पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जातो. एम.डी. होमिओपॅथी पदवी केंद्रीय होमिओपॅथी परिषदेच्या कायद्यानुसार द्वितीय परिशिष्टात समाविष्ट होणे आवश्यक असते. त्यासाठी विद्यापीठातर्फे केंद्र सरकारकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. केंद्र शासनाने सदर प्रस्ताव केंद्रीय होमिओपॅथी परिषदेकडे पाठविल्यानंतर या प्रस्तावावर चर्चा होऊन सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यासाठी विद्यापीठाच्या होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अरुण भस्मे यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, एम.डी. (होमिओपॅथी) मधील होमिओपॅथीक मटेरिका मेडिका, ऑर्गनन, रेपरट्री, मेडिसिन, पेडियाट्रिक्स, सायकियाट्री व फार्मसी या सात विषयांतील पदवी केंद्रीय होमिओपॅथी परिषद कायदा १९७३ च्या द्वितीय परिशिष्टात समाविष्ट करण्याबाबतची शिफारस केंद्र शासनाकडे करण्यात आली होती. याअनुषंगाने केंद्र सरकारने यासंदर्भातील राजपत्र (Gazette) प्रसिध्द केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

विद्यापीठाच्या होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अरुण भस्मे यांनी सांगितले की, एम.डी. होमिओपॅथी या पदव्युत्तर अभ्यासक्रमास केंद्र शासनाची मान्यता मिळाल्याने या विद्यापीठातून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी इतर राज्यात प्रॅक्टिस करु शकतील. याकामी केंद्रीय होमिओपॅथी परिषदेचे अध्यक्ष डॉ.रामजी सिंग, डॉ.एस.एम. देसरडा, डॉ.व्ही.आर. कविश्वर, डॉ.ए.बी. जाधव, डॉ.रवी भोसले आणि विद्यापीठाच्या उपकुलसचिव श्रीमती विद्या ठाकरे आदींनी विशेष प्रयत्न केले.

**कुलसचिव**